**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022**
**Website:** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-**:vanarti.info@gmail.com

जा.क्र.वनार्टी/नागपूर/आस्था/ 439/2026-27 दिनांक :- 08/06/2026

## पोलिस/मिलिटरी भरती 2026-27 परीक्षा पूर्व ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील नॉन-क्रिमिलेअर गटातील विद्यार्थ्यांना वनार्टी मार्फत पोलिस/मिलिटरी भरती या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

- **प्रशिक्षणाचा कालावधी** - **6 महिने**
- **विद्यावेतन** - 10,000/- **प्रतिमाह (75% उपस्थिती असल्यास)**
- **एकरकमी आकस्मिक निधी** 12,000/- **(एकवेळ)**

**➤ योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी विमुक्त जाती / भटक्या जमाती (VJNT) प्रवर्गातील असावा/असावी.
3. विद्यार्थ्यांची अंतिम निवड छाननी परीक्षेद्वारे करण्यात येईल.
4. चाळणी परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत स्वतंत्रपणे वनार्टीच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

**अ) पोलिस भरती प्रशिक्षणाकरिता पात्रता** :

1. उमेदवार किमान 12 वी उत्तीर्ण असावा/असावी.
2. उमेदवाराचे किमान वय 18 वर्षे व कमाल वय 33 वर्षे असावे. (शासनाच्या प्रचलित नियमांनुसार वयोमर्यादेत बदल लागू राहतील.)

**ब) मिलिटरी भरती प्रशिक्षणाकरिता पात्रता :**

1. उमेदवार किमान 10 वी उत्तीर्ण असावा/असावी.
2. उमेदवाराचे किमान वय 17 वर्षे व कमाल वय 21 वर्षे असावे.

**वैद्यकीय अर्हता :-**

- **उंची** :- कमीत कमी 165 से.मी **(पुरुष)**
  कमीत कमी 155 से.मी **(महिला)**
- **छाती** :- कमीत कमी 79 से.मी (दीर्घ श्वास घेतल्यानंतर 84 से.मी) केवळ पुरुषांकरिता

**प्रशिक्षणाकरिता द्यावयाचे अनिवार्य वैद्यकीय मानके :-**

- उमेदवाराचे शरीर मजबुत आणि चांगले मानसिक आरोग्य असावे.
- छातीचा विकास कमीत कमी 5 से.मी विस्तारित असावा. (केवळ पुरुषांकरिता)
- प्रत्येक कानाने सामान्य ऐकणे आणि दोन्ही डोळ्यांमध्ये चांगली दुरबीन दृष्टि असणे आवश्यक आहे. त्याला प्रत्येक डोळ्याने 6/6 अंतराचा दृष्टिकोन वाचता आला पाहिजे. (सैन्य भरती साठी रंग दृष्टी चाचणी CP-III असावी.)
- नैसर्गिक निरोगी हिरड्या आणि दात पुरेशा प्रमाणात असणे आवश्यक आहे. (म्हणजे किमान 14 दंत बिंदु)
- हाडांची विकृती, हायड्रोसेल आणि व्हॅरिकोकल किंवा मुळव्याध यांसारखे रोग नसावेत.
- लाल आणि हिरवा रंग ओळखला पाहिजे. (उपरोक्त सर्व कागदपत्रांची छाननी व अनिवार्य मानकांची तपासणी करुनच प्रशिक्षणाकरिता प्रवेश दिल्या जाईल. याची उमेवारांनी नोंद घ्यावी)

**प्रशिक्षणाचे स्वरूप :**

1. विद्यार्थ्यांना पोलिस/मिलिटरी भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण तसेच लेखी व शारीरिक परीक्षांचे अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्यात येईल.
2. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा 6 महिन्यांचा असेल.
3. प्रशिक्षण अनिवासी स्वरुपाचे असेल.
4. प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपाचे देण्यात येईल.

**आरक्षण :**

**सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | सामाजिक प्रर्वग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विमुक्त जाती (VJ-A) | 40% |
| 2 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 22.50 % |
| 3 | भटक्या जमाती क (NT-C) | 22.50 % |
| 4 | भटक्या जमाती ड (NT-D) | 15 % |
| | एकूण | 100% |

**आरक्षण पुढीलप्रमाणे :**

1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
2. दिव्यांगाकरिता 5% जागा आरक्षित आहे.
3. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

## अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:-

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजूसह)
2. जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)

**अ) पोलिस भरती प्रशिक्षणाकरिता :**

4. इयत्ता 12 वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
5. शाळा सोडल्याचा दाखला (Leaving Certificate)
6. अनाथ प्रमाणपत्र (लागू असल्यास)
7. दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास)

**ब) मिलिटरी भरती प्रशिक्षणाकरिता :**

4. इयत्ता 10 वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
5. शाळा सोडल्याचा दाखला (Leaving Certificate)
6. अनाथ प्रमाणपत्र (लागू असल्यास)
7. दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास)

## अर्ज कसा करावा :-

1. वनार्टीच्या **www.vanarti.in** या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "**Application for Police/Military Bharti - 2026-27 Training**" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्ज भरतांना काही माहिती ही लाल रंगाच्या चिन्हाने दर्शविलेली असल्याने ती माहिती उमेदवारांना भरणे बंधनकारक आहे.
3. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.

## अटी व शर्ती :-

1. अर्ज करण्याचा अंतिम दि. 25/06/2026 राहील.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांचे राहतील.
4. चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांकनानुसार मेरीटच्या आधारे व आरक्षित जागांच्या प्रमाणात पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी व प्रतीक्षा यादी वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
5. प्रशिक्षणाकरीता निवड झालेले विद्यार्थी ज्या दिनांकास संस्थेत प्रशिक्षणाकरीता रुजू होतील त्या दिनांकापासुन त्यांना वनार्टीच्या धोरणानुसार विद्यावेतन लागू होईल. तथापि प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्यांनाच विद्यावेतन देय राहिल.
6. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती कायदेशीर कार्यवाईस पात्र राहील.
7. या पूर्वी वनार्टीच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी 'या संस्थेकडून योजनेचा लाभ घेतलेला असल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
8. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.

9. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारची अडचणी आल्यास कार्यालयीन वेळेत वनार्टीच्या कॉलसेंटरवर संपर्क करावा.

- **संपर्क क्रमांक :-** 7887882026
- **E-mail Id :-** vanarti.info@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा
- **संस्थेचे संकेतस्थळ (Website)** :- www.vanarti.in

**स्वा**
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी)